## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १९१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०४/२०१८

**१) महिलेवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०४/२०१८ चे १४.५४ वाजता दरम्यान यातील फिर्यादी पिडीत ही आपले घरी एकटीच हजर असतांना आरोपी हा तिचे घरी पिण्याचे पाणी मागण्याचे बहाण्याने आला फिर्यादी ही पाणी आणण्याकरीता घरात गेली असता आरोपी हा तिचे मागे–मागे जावुन तिचे हाताला, चेह–याला ओरपडुन तिचेवर शारिरीक अत्याचार केल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉ. परिक्षण रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३७६(१),४५ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वर्मा पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२) सोन्या – चांदीचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी :–**

दिनांक ११/०४/२०१८ चे १२.०० ते १२/०४/२०१८ चे ०४.३० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादी व त्याचा लहान भाऊ अनिल वैद्य यांचे घराचे दाराची कडी कोंडा तोडुन आत प्रवेश करुन घरातील लोखंडी आलमारीतुन १ सोन्याची अंगठी ६ ग्रॅम, १ सोन्याची अंगठी ४ ग्रॅम, १ सोन्याचा मंगळसुत्र ज्यात मनी ३ ग्रॅम, १ सोन्याची तुकळी ६ ग्रॅम, १ सोन्याची नथ ३ ग्रॅम, २ नग चांदीच्या पायपट्टया १५० ग्रॅम, १ मिक्सर व नगदी ६०,०००/–रु. असा एकुण १, १५, ५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी अंकुश गोमाजी वैद्य वय ४२ वर्ष रा. पांढराबोळी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. इंगळे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**३) क्षुल्लक कारणावरुन लोखंडी रॉडने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०४/२०१८ चे १६.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच गावचे राहणारे असुन यातील फिर्यादीने आरोपीचे शेतावर मजुरीने जाणे बंद केल्याने त्या गोष्टीचा मनात राग धरुन आरोपीने फिर्यादीच्या डोक्यावर लोखंडी रॉड मारुन जखमी केल्याने फिर्यादी जग्गु लक्ष्मण उपथळे वय ४२ वर्ष रा. आसगांव यांचे बयाण व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४) क्षुल्लक कारणावरुन भांडण व शिवीगाळ करुन दगडाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०४/२०१८ चे ०८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी राजेश्वर मोतीराम गभणे वय ६५ वर्ष, आरोपीला स्वत:चे राशन कार्ड मागीतले असता आरोपीने फिर्यादी सोबत भांडण, शिवीगाळ करुन अंगणातील दगड उचलुन फिर्यादीचे बयाण व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) क्षुल्लक कारणावरुन लाकडी बल्लीने व पोटावर लाथाबुक्याने मारहान करुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०४/२०१८ चे १८.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हिवराज बाबुराव चांदेवार वय ४५ वर्ष, रा. बाम्पेवाडा हा आरोपीचे घराचे शेजारी असलेल्या अतिक्रमण जागेत शेण टाकणेकरिता गेला असता यातील आरोपी क्र. ०१ ने फिर्यादीस लाकडी बल्लीने खांदयावर व डोक्यावर मारहाण करुन दोन्ही खांदयावर चावा घेतला व आरोपी क्र. ०२ व ०३ ने संगनमत करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन पकडुन ठेवले आणि आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे पोटावर लाथाबुक्यांने मारहान करुन जखमी केल्याने व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२३,३२४,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गोंडाणे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**६) ऑईल टॅन्क मध्ये गुदमरुन दोन इसम मरण पावल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०४/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी ईसन माधो ब्राम्हणकर वय ६० वर्ष, रा. चिखली जि. गोंदिया हा त्याचा पुतण्या विलास दामाजी ब्राम्हणकर वय ३३ वर्ष व अनामिका भैय्यालाल ऊके वय ३२ वर्ष, दोन्ही रा. चिखली यांचे सह चारगाव फाटा येथील एस. के. मेहता अॅन्ड कंपनी मध्ये डांबर ब्रदीचा हार्ट मिस्क प्लॅट मध्ये गाळ काढण्याचे काम करीत असता ऑईल टॅन्क मध्ये गुदमरुन त्यांना ऑईल टॅन्कचे बाहेर काढल्या नंतर काही वेळातच अनामिका उके हा घटनास्थळीच मरण पावला तसेच विलास दामाजी ब्राम्हणकर याला सरकारी दवाखाना येथे नेले असता उपचार मिळणे पुरविच त्याचा मृत्यु झालेला आहे. तसेच इसन माधे ब्राम्हणकर यांचे उजवे डोळयाजवळ जळजळ होत असल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मर्ग क्र. १०/१८ कलम १७४ जाफौ. चे दाखल असुन मर्ग चौकशी अहवाल व सरतर्फे फिर्यादी सपोनि. वर्मा यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३०४,३४ भादवी. अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. पिंपेरवार पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**७) संगनमत करुन जनावरांची कत्तल करुन ताब्यात बाळगुन मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०४/२०१८ चे १२.०० ते १३.०० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन त्याचे राहते घरी गौवंश जातीचे जनावरांची कत्तल करुन मास ताब्यात बाळगुन मिळुन आल्याने त्याचे पासुन १ आड जातीचा लाकडी कुंदा किंमती ५०/–रु., मास कापण्याचा लोखंडी काता किंमती ५०/–रु., ६१ किलो ४०० ग्रॅम, वजनाचे गौमांस किंमती ६,१००/–रु., १ पांढऱ्या रंगाची गाय किंमती ४,०००/–रु. १ लोखंडी काटा किंमती ५,००/–रु., व ०.५ किलोचे वजन माप किंमती २०/–रु. असा एकुण १०,७२०/–रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी भांदवि सहकलम ५(क),९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधि. १९७६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गदादे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**८) महिलेस अश्लिल शब्गदात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १३/०४/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही पोलीस पाटील असुन तंटामुक्ती पुरस्काराची माहीती मागण्यास ग्रा. पं. भोजापुर येथे गेली असता यातील आरोपीने अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तुला माहिती देत नाही तुला माहीती देत नाही तुझ्याने जे बनते ते कर अशी धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २९४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. बोरकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**९) अज्ञात मोटार सायकल वाहनाच्या धडकेत चिरमुडा गंभिर जखमी झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १०/०४/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा पुतण्या मानव झंझाड वय ०५ वर्ष हा रोड ओलाडून आपले वडीलाकडे पायी जात असतांना यातील अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल दुसऱ्याचे जिवीतास धोका पोहचेल अश्या रितीने भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन जखमीस धडक मारुन डोक्याला मार लागुन गंभिर जखमी करुन पळुन गेल्याने फिर्यादी श्याम चंद्रभान झंझाड वय ३१ वर्ष, रा. हरदोली यांचे तोंडी व जखमीचे वैदयकीय रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १३४, १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. निरगुडे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**१०) दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्‌देशाने मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक १२/०४/२०१८ चे २३.५५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे पोलीस स्टॉपसह पोलीस गाडीने गस्त करीत असता मोहाडी येथील मोठा बस स्थानक येथे फिरत असता २ ईसम हे बस स्थानक चे ईमारतीचे भिंती लगत अंधारात संशयास्पद ईसम सुर्यास्त व सुर्यादया पुर्वी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्येशाने लपुन बसले दिसल्याने संशय आल्याने त्यास हटकले असता ते पळुन जावुन लागल्याने त्यांचा पाठलाग करुन जागीच पकडले असता त्यांना त्यांचे नाव – गाव विचारले असता उडवाउडविचे उत्तरे देवु लागल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. चांदेवार यांचे रिपोर्ट वरुन वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १२२(सी) मुंबई पोलीस अधिनीयम १९५१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चांदेवार पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**११) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक १३/०४/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील आटो वाहन ही मुरमाडी तुप येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. तिजारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. भलावी पोलीस स्टेशन पालांदुर करीत आहेत.

**ब)** दिनांक १३/०४/२०१८ चे १५.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील आटो वाहन ही मुरमाडी तुप येथे आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने, सरतर्फे फिर्यादी पोना. तिजारे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. भलावी पोलीस स्टेशन पालांदुर करीत आहेत.

**१२) अवैध दारु अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १३/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, तुमसर, सिहोरा, गोबरवाही, साकोली व पवनी येथे अवैध हातभट्टी दारू अडड्यावर धाडी घालुन एकुण १० गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ९५ लिटर हातभंट्टी दारू किंमती किमती ७,१६०/रु. व १ लिटर ८० मिली लिटर देशी दारु किंमती ३१२/–रु. असा एकुण किंमती ७,४७२/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१३) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक १३/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी – ०३ तीन सिटर वाहनाकरीता– ११ ईतर वाहनांवरती – ११८ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.